# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाला

## " दिलासा "

अकोला जिल्हयातीत शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच काही प्रकरणातुन असे निदर्शनास आले की पुर्णतः शेतीवर अवलंबुन असलेले शेतकरी व शेतीकरीता पाण्याची सुविधा उपलब्ध नसलेल्या शेतकरी कुटूंबांमध्येच आत्महत्येचे सारख्या घटना घडत असल्याचे निदर्शनास आले आहे. येथील शेतक-याचा एकमेव व्यवसाय शेती असल्या कारणाने तो शेतकरी नियमितपणे शेतीमध्ये पेरनी करतो परंतु निसर्गाच्या लहरीपणामुळे पावसात खंड पडल्यास किंवा अतिवृष्टी झाल्याने ओला अथवा कोरडा दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. तसेच हाती आलेले अत्यल्प पिक उत्पन्न,मार्केट मधील धान्य खरेदीतील चढ-उतार यामुळे शेतक-याच्या मालाला योग्य किंमत न मिळणे परिणामी सदर शेतक-याचे आर्थिक अडचणीमुळे मनोधैर्य खचते त्यामुळे तो आत्महत्या करण्याचा पवित्रा घेतो. सदर प्रकरण तालुकस्तरीय समिती कडुन जिल्हास्तरीय समितीकडे येतो. शासन निकषानुसार प्रकरण पात्र / अपात्र ठरविल्या जातो.पात्र शेतकरी आत्महत्या कुटूंबातील वारसाला रुपये एक लक्ष या प्रमाणे आर्थिक मदत वितरीत करण्यात येत आहे त्यामधुन सदर शेतक-याच्या वारसाला तात्काळ रुपये ३०,०००/-अक्षरी (तीस हजार फक्त ) दिली जाते पैकी शिल्लक रक्कम ७०,०००/-अक्षरी ( सत्तर हजार ) नियमाप्रमाणे वारसाच्या पोष्टामधील बचत खात्यात जमा करावे लागतात. परंतु आत्महत्याग्रस्त कुटूंबातील वारसांना आर्थिक मदतीपोटी कितीही मदत दिली तरी सदर कुटूंबाची उणीव भरुन निघत नाही. घरातील कर्ता पुरुष निघुन गेल्यामुळे व सदर कुटूंबाकडे शेती व्यतिरीक्त दुसरे कमाईचे साधन नसल्यामुळे ते कुटूंब दैनीय

अवस्थेते जात असतो.अशा कुटूंबाचे सर्व्हेक्षण करण्याबाबत जिल्हा प्रशासना निर्णय घेण्यात आला आहे. सदर सर्व्हेक्षण हा जिल्हयातील सर्व तालुकास्तरावर तहसिलदार यांच्या अध्यक्षते खाली नायब तहसिलदार, कृषी मंडळ अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक इत्यादी कर्मचारी यांची समिती नियुक्त करुन सदर समिती मार्फत आत्महत्याग्रस्त कुटूंबाचे सर्व्हेक्षण करुन आत्महत्याग्रस्त कुटूंबातील व्यक्ती निहाय माहीती घेण्यात येईल. त्यानुसार सदर आत्महत्याग्रस्त कुटूंबातील व्यक्तींच्या आवश्यकते प्रमाणे शेतीमध्ये सिंचनाची सुविधा उपलब्द करुन देणे, घरातील खर्च भागविण्याच्या अनुषंगाने शिलाई मशिन देणे किंवा गृहउद्योगा करीता सुविधा उपलब्द करुन देणे त्याकरीता बँक/बचतगट मार्फत गृहउद्योगा करीता आवश्यक मदत व मार्गदर्शन करविण्याची सुविधा उपलब्धकरुन देणे, किंवा काही कुटूंबातील तरुणांना ग्रामिण भागातच व्यवसाया करीता आर्थिक साहाय व आवश्यक मार्गदर्शन देवुन तसेच काही सुशिक्षीत तरुणांना औद्योगिक शहरामध्ये रोजगार मिळण्याकरीता आवश्यक शिफारस पत्र देणे किंवा शासनाच्या विविध विभागामध्ये सुरु असलेल्या योजना लाभ सदर कुटूंबाला दिल्यास रोजगार निर्माण होवुन कुटूंबाचे उदरनिर्वाह भागवु शकेल. या बाबत सदर कुटूंबाची संपुर्ण माहीती नियुक्त तालुकास्तरीय समितीने घेण्याबाबत जिल्हा प्रशासनाकडुन निर्देश देण्यात आले आहेत.

त्यानुसार बाधित आत्महत्याग्रस्तांची आवश्यक माहीती उपलब्द झाल्यानंतर शासनाच्या विविध विभागामध्ये सुरु असलेल्या योजना लाभ देवुन शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबाला पुन्हा आपल्या पायावर उभे करण्याचे जिल्हा प्रशासनाने निश्चीत केले आहे.

जिल्हा प्रशासनाकडुन कार्यक्रम **" दिलासा "** अंतर्गत आत्महत्यागस्त कुटूंबाला शासनाच्या विविध योजनामधुन रोजगार निर्मितीबाबत प्रेरीत करुन त्यांना त्याबाबत आवश्यक सहकार्य करण्याचा कार्यक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे.आत्महत्याग्रस्त कुटूंबाला उपाययोजने मधुन खालील दिलेल्या शासनाचा योजनांचा लाभ देता येऊ शकतो.

- मत्स व्यवसाय - मत्स्यबीज केंद्राची स्थापना,मासेमारी साधनाच्या खरेदीवर अर्थसहाय,आत्मा योजने अंतर्गत शेततळीकरीता मत्सबीज वाटप
- महात्मा गांधी नरेगा अंतर्गत सिंचन विहीर योजनेचा लाभ देवुन सिंचनाची सुविधा उपलब्द करुन देणे.
- रोजगार हमी योजने अंतर्गत रोजगार उपलब्द करुन देणे.
- महिला व बालविकास विभागा अंतर्गत आत्महत्याग्रस्त शेतक-याचे पत्नीला आवश्यकतेनुसार शिलाई मशिन किंवा उदरनिर्वाह करीता दैनदिन रोजगाराचे आवश्यक साधन उपलब्द करुन देणे.
- समाज कल्याण विभागाअंतर्गत आत्महत्याग्रस्त कुटूंबातील तरुणांना मोटर ड्रायव्हिंग किंवा आवश्यक प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्द होण्याच्या अनुषंगाने शिफारस पत्र देणे.
- समाज कल्याण विभागाअंतर्गत आत्महत्याग्रस्त कुटूंबात तरुणाची इच्छा असल्यास ग्रामीण भागातच रोजगाराचे साधन उपलब्द करुन देणे.
- महिला व बालविकास विभागाअंतर्गत बालसंगोपन, सामुहिक विवाह योजनेस अनुदान देणे .
- पदुम विभागअंतर्गत कंत्राटी पध्दतीने मांसल कुक्कुट पक्षी ( ब्रॉयलर) पालनाचा कार्यक्रम राबविणे.

- जिल्हा उद्योग केंद्रा मार्फत गृह उद्योग निर्मितीसाठी साधन सामग्री उपलब्धता तसेच आर्थिक भाडवलाकरिता आवश्यक मार्गदर्शन व शिफारस करणे.
- गावपातळीवरील समिती मार्फत त्रस्त कुटूंबातील सदस्यांना समुपदेशन करणे.
- जिल्हा आरोग्य विभागाअंतर्गत मनोविकार तज्ज्ञाकडुन शेतकरी कुटूंबातील बाधीत सदस्यांचे उपचार करणे.
- जि.प. आदिवासी विभागाअंतर्गत घरकुल योजनेचा लाभ देणे.
- जि.प.कृषी विभाग ( प.स.अंतर्गत ) राज्यपुरस्कृत पिक संरक्षण,विशेष घटक योजना,सौर कंदिल, इलेक्ट्रीक पंम्प,डिझल पंम्प,पावर स्प्रे,ताडपत्री,पोरस पाईप,पेरणी यंत्र इत्यादी शासकिय योजनांचा लाभ देता येईल.
- पशु संवर्धन विभागाअंतर्गत तोंडखुरी-पायखुरी योजना,वैरण बियाणे योजना, संकरीत कालवडी, दुधाळ जनावरे, कुत्रीम रेतन, कुक्कुटप्रकल्प, कामधेनु दतक इत्यादी शासकिय योजनांचा लाभ देता येईल.
- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मार्फत कृषी पंपाकरिता कनेक्शन वाटप.
- जिल्हा परिषद कॅश फंड अंतर्गत प्राधान्य देणे.
- जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अंतर्गत महिला बचत गट (SHGS) गठीत करणे व बचत गटांना revoluing fund व बँक लोन पूरविणे.
- शिक्षण विभाग जि.प. अंतर्गत ग्रामीण भागातील विद्यार्थांना खजगी विद्यालय व महाविद्यलया मध्ये प्रवेशा करीता २५ टक्के प्राधान्य.

# जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला

क्रमांक : क्र.कक्ष-६(४)/पॅकेज/कावि- ६१२ - २०१५

दिनांक.२१ नोव्हेंबर २०१५

# परिपत्रक

अकोला जिल्हयातीत शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. काही प्रकरणातुन असे निदर्शनास आले की पुर्णतः शेतीवर अवलंबुन असलेले शेतकरी कुटूंबांमध्येच आत्महत्येचे सारख्या घटना घडत आहेत. त्याअनुषंगाने जिल्हयातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाकरीता कार्यक्रम " दिलासा " राबविण्याचे जिल्हा प्रशासनाने निश्चीत केले आहे. सदर कार्यक्रमा अंतर्गत आत्महत्याग्रस्त कुटूंबातील सदस्यांच्या आवश्यकते नुसार त्यांना शासनाच्या विविध विभागामध्ये सुरु असलेल्या योजनांचा लाभ देवुन शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबाला पुन्हा आपल्या पायावर उभे करण्याचे जिल्हा प्रशासनाने निर्णय घेतला आहे. त्याअनुषंगाने तालुक्यातील आत्महत्याग्रस्त कुटूंबाचा सर्व्हेक्षण करण्यासाठी उपविभागिय अधिकारी यांच्या अध्यक्षते खाली तीन ग्रुप तयार करुन त्याच्याकडुन सर्व्हेक्षण करण्याचे निर्देश या पुर्वीच देण्यात आले आहेत.

तसेच जिल्हयातील शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्याकरीता आत्महत्याग्रस्त गांवात "बळीराजा" समिती गठीत करण्याचे निश्चीत केले आहे.सदर समिती ची कार्यकारणी पुढील प्रमाणे असणार आहे. १) सरपंच, अध्यक्ष ,२)पोलीस पाटील सदस्य सचिव,३)तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, सदस्य ४) तलाठी निमंत्रक ५)ग्रामसेवक सदस्य ६)कृषी साहायक सदस्य ७)अंगणवाडी सेविका ८)आशा वर्कर

९)गावातील  प्रतिष्ठीत शेतकरी एक १०) सामाजिक संस्थेचे अध्यक्ष, भजनी मंडळाचे सदस्य १०) माजी सैनीक व निवृत्त शिक्षक (असल्यास) याप्रमाणे “बळीराजा” समिती तातडीने गठीत करुन संबंधीत तलाठी तहसिलदार यांना सदर समितीची माहीती सादर करतील. तसेच गठीत “बळीराजा” समितीचे कार्य पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहे. सदर समिती मार्फत गावातील तणावग्रस्त शेतकरी कुटूंब शोधुन त्यांची माहीती संबंधीत तहसिलदार यांना सादर करतील तसेच तालुकास्तरीय समितीच्या मार्गदर्शनात जिल्हा प्रशासन राबवित असलेला कार्यक्रम “ दिलासा “ च्या माध्यमातुन शासनाच्या विविध विभागामध्ये सुरु असलेल्या योजनाचा लाभ तणावग्रस्त शेतकरी कुटूंबाला देवुन समुपदेशन करुन सदर कुटूंबाताल सर्व सदस्यांना तणाव मुक्त  करणे आवश्यक आहे. या उदेृशाने खालील प्रमाणे उपाययोजना करणे आवश्यक आहे.

## // बळीराजा यांना समुपदेशनाकरीता दशसुत्री कार्यक्रम //

१. **<u>शेतक-यासाठी अन्नसुरक्षा योजना</u>** :-

तालुक्यातील प्रत्येक गावातील शेतकरी या योजनेपासुन वंचीत राहणार नाही यांची दक्षता घ्यावी व दरमहा सर्व शेतक-यांना धान्य मिळते किंवा नाही यांची खात्री करावी.

२. **<u>शेतक-यांच्या आरोग्यविषयक अडचणी सोडविण्यासाठी आरोग्य शिबीर (राजीव गांधी जीवनदायी योजनांची प्रभावी अंमलबजावणी)</u>**

दुर्धर आजारग्रस्त शेतक-यांना राजीव गांधी जिवनदायी योजनेचा लाभ मिळवून देणे.त्याकरीता दरमहा प्राथमिक आरोग्य केद्रावर गांव निहाय शेतक-यांचे आरोग्य तपासणी शिबीरे आयोजित करावे. त्यामध्ये दुर्धर आजारग्रस्त शेतकरी आढळल्यास त्यांना जिल्हास्तरावरील जिल्हा सामान्य रुग्णालय येथे उपचारा करीता पाठवावे. त्याबाबतची माहीती जिल्हा आरोग्य अधिकारी यांना पाठवावी.

३. **<u>संरक्षित जलसिंचन (मागेल त्याला विहीर व शेततळयाची योजना)</u>** :-

प्रत्येक शेतक-याला ओलीताच्या सोई सुविधा होण्याकरीता ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत मागेल त्याला विहीर व शेततळयाची योजना प्रभावीपणे राबवीण्यात यावी. तसेच जलयुक्त शिवार अभियाना मध्ये संरक्षित ओलीताच्या सर्व सुविधा करण्यासाठी निर्णय लवकर देणे. त्याच प्रमाणे कृषी विभागा मार्फत जलसिंचनाची साधने उपलब्ध करुन देणे.

४. **<u>विज जोडणी - मागेल त्याला विज जोडणी / सोलर उर्जेसाठी प्रयत्न</u>** :-

विज जोडणीची सर्व प्रलंबित अर्ज ३१/०३/२०१६ पर्यंत कोणत्याही परिस्थितीत पुर्ण करण्याचे नियोजन करणे. प्रत्येक शेतक-याला विज पुरवठा होईल या दृष्टीने नियोजन आराखडा तयार करणे.

५. **<u>सामुहीक विवाह सोहळयाचे आयोजन</u>** :-

शेतक-यांच्या मुला-मुलींच्या विवाहाकरीता सामुहीक विवाह सोहळे सेवा भावी संस्थाच्या माध्यमातुन करण्यात यावे. तसेच “एक गांव एक तिथी” उपक्रम राबविण्यात भर देण्यात यावा.

६. **<u>प्रत्येक गांवाकरीता / अधिकारी / कर्मचारी दत्तक योजना</u>** :-

"आत्महत्या मुक्त गांव" करण्याच्या अनुषंगाने तालुक्यातील प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांना प्रत्येक गांव दत्तक देणे. सदर अधिकारी/कर्मचारी यांनी गांवक-यांशी समन्वय साधुन गांवातील सर्व शेतक-यांनी "आत्महत्या मुक्त गांव" करण्याचा संकल्प करावा. करीता गांवाला वारंवार भेटी देणे.त्याबाबतचा अहवाल तालुकास्तरावर सादर करणे.

७. **<u>पशुसंवर्धन योजनांची प्रभावी अमलबजावणी</u>** :-

ग्रामस्तरीय समितीने गांवक-यांशी समन्वय साधुन गांवातील सर्व शेतक-यांच्या पशुधनाला लागणा-या चा-याबाबत शेतक-यांना नियोजन करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करणे.पशुसंवर्धनविभागा अंतर्गत येणा-या "वैरण विकास योजना" करीता अनुदान तत्वावर बियाणे वाटपा ची माहीती शेतक-यांना देणे

८. **<u>कौशल्य विकास व उद्योजकता विभाग</u>** :-

शेतक-यांच्या मुलांकरीता रोजगाराभिमुख कौशल्य विकास कार्यक्रम राबविणे. तसेच तालुकास्तरावर शेतक-यांच्या मुलांकरीता रोजगाराभिमुख कौशल्य विकास पर मार्गदर्शन व प्रशिक्षण केद्र सुरु करावी.

९. **<u>मागेल त्याला कर्ज</u>** :-

मागेल त्याला कर्ज, या शिर्षकान्वये जिल्हयातील सुशिक्षीत बेरोजगार युवकांना गृह उद्योग/व्यवसायाची उभारणी करण्याकरीता कर्ज उपलब्ध करुन देणे. शेतक-याना पिक कर्ज व पिक कर्जाचे पुनर्गठन करणे जिल्हयातील शेतक-यांच्या कर्जामध्ये अधिकाधिक शिथीलता आणून शेतक-याना दिलासा मिळेल असे धोरण राबविणे.

10. **<u>लोक सहभागातुन विकास</u> :-**

सेवा भावी संस्था, कृषी विकास व मार्गदर्शन गट, दानशुर व्यक्ती यांच्या सहकार्याने ग्रामस्तरीय

समितीने गांवातील शेतक-यांसाठी शेती विषयक मार्गदर्शन व शेतकरी विकास कार्यक्रम राबविण्यात यावे.

**********************

तसेच ग्रामस्तरीय “बळीराजा” समिती गांवातील तणावग्रस्त शेतकरी कुटूंबाला आवश्यकते प्रमाणे योजनांचा लाभ देण्यासाठी व समुपदेशन करण्यासाठी समितीच्या वतीने सरपंच व तलाठी हे महीन्याच्या १५ व १ तारखेला ग्रामस्तरावर सभा बोलावुन सदर सभेमध्ये गावात सामुहीक विवाह सोहळा आयोजित करणे बाबत निर्णय घेणे तसेच तणावग्रस्त कुटूंबाचा आढावा घेवुन वरील दससुत्री कार्यक्रम राबविण्याबाबत निर्णय घेणे तसेच शासनाच्या विविध विभागा अंर्तगत सुरु असलेल्या योजनांचा लाभ तणावग्रस्त शेतक-यांना देण्याबाबत तालुकास्तरीय समितीकडे प्रस्तावीत करणे. तसेच संबंधीत तहसिलदार हे उपविभागिय अधिकारी यांच्या अध्यक्षते खाली तालुकास्तरीय समितीचे आयोजन करतील व प्राप्त सर्व प्रस्तावांवर निर्णय घेतील व शासनाच्या विविध विभागा अंतर्गत सुरु असलेल्या योजनांचा लाभ सदर तणावग्रस्त शेतकरी कुटूंबाला देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करतील.तसेच तणावग्रस्त शेतकरी कुटूंबाला लाभ मिळाला किंवा नाही याबाबत महीन्यातील प्रत्येक आठवडयाला प्रत्यक्ष आढावा घेतील. जर एखादया तणावग्रस्त शेतकरी कुटूंबाला शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यास संबंधीत अधिकारी/कर्मचारी दिरंगाई करीत असतील किंवा इतर कारण असल्यास त्याबाबतची माहीती या कार्यालयाला सादर करतील.

जी.श्रीकांत (भा.प्र.से.)

**जिल्हाधिकारी अकोला**

# “आपण सारे आपले गांव आत्महत्या मुक्त गांव करण्याचा संकल्प करुया”

# “शेतकरी बांधवांना पत्र”

श्री...........................................

सप्रेम नमस्कार विनंती विशेष...

अचानक जिल्हाधिका-यांचं पत्र पाहून आश्चर्य वाटलं असेल, नाही का ? जिल्हयातील प्रत्येक शेतक-याला प्रत्यक्ष भेटणं शक्य नसल्यामुळे तुम्हासोबत मी हा पत्ररूपी संवाद साधत आहे. आजच सकाळी वर्तमानपत्र हातात घेतलं नि पहिल्याच पानावर शेतकरी आत्महत्येची बातमी ! रोज वर्तमानपत्रात एक तरी शेतकरी आत्महत्येची बातमी वाचनात येतेच. वाचून मन अतिशय विषण्ण होतं. दुष्काळ, नापिकी वा आर्थिक विवंचनेला कंटाळून शेतक-याने गळयाला फास आवळलेला असतो. मृत्युला कवटाळलेले असते. मनाला प्रश्न पडतो की, खरंच आत्महत्या हा आर्थिक विवंचनेवर उपाय ठरु शकतो काय ? याउलट आत्महत्येमुळे कुटूंबाची विवंचना अधिक जटिल झाल्याचेच दिसून येते. मुलाबाळांची आबाळ होते , म्हाता-या आई-वडीला चा आधार जातो व पत्नीवरच कुटुंबाचा सगळा भार पडतो. या सा-यांचं जगणं केविलवाणं करुन काय मिळवतो हा ‘आत्महत्या’ करणारा गृहस्थ ? **शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे**. शेतक-याचं दुःख हे प्रशासनाचं दुःख आहे. ‘आत्महत्या’ हा आपल्या गावाला, जिल्हयाला नव्हे संपूर्ण मानव जातीलाच कलंक आहे. हा कलंक पुसण्यासाठी मी या पत्राव्दारे विनंती करतो की, **आत्महत्या करु नका.**

तसेच जिल्हयातील आर्थिक विवंचनेत सापडलेल्या शेतकरी व शेतमजुरांना मदतीचा हात देण्यासाठी मी **‘मिशन दिलासा’** च्या माध्यमातून शासनाच्या विविध विभागातील योजना प्रभावी पणे आपणापर्यंत पोहचविण्यासाठी सदैव तत्पर आहे. **‘शेतकरी आत्मसन्मान अभियान’**, **‘दिलासा’**, **‘शेतकरी समुपदेशन केंद्र’** याव्दारे शासन प्रशासनामार्फत विवंचनाग्रस्त शेतक-यांना आधार देउुन त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहे. फार मोठया दुष्काळांना, नैसर्गिक आपत्तींना व संकटांना झेलून आमचे पूर्वज हिंमतीने जगण्याला सामोरे गेले आहेत. अन्नही खायला मिळत नसे, तरीही त्यांनी कधी आत्महत्या केल्या नाहीत. ही जाणीव ठेवून तुम्ही आलेल्या समस्येला खंबीरपणे

सामोरे जायला हवे.  आपल्या कुटुंबातील प्रिय जनांना दुःखाच्या सागरात लोटून व अडचणीत टाकून जाण्यात कुठलाच, **पुरुषार्थ नाही**.

तेव्हा तुम्हास कळकळीची विनंती आहे की ,**हिम्मत हारु नका. खंबीर बना.** शासन व प्रशासन तुमच्यासोबत आहे. आपले गावातील सर्व ग्रामस्थ मिळून एक **संकल्प** करा की, **आमच्या गावातील एकही व्यक्ती आत्महत्या करणार नाही** व **आम्ही कुणाला आत्महत्या करुही देणार नाही. आमचे गाव आत्महत्यामुक्त गाव करण्यासाठी आम्ही सर्व मिळून प्रयत्न करु.  आमच्या जिल्हयाला लागलेला हा कलंक आम्ही मिटवून टाकू.**

तुम्हा सर्व गावक-यांच्या सुख-दुःखात महाराष्ट्र शासन व जिल्हा प्रशासन सदैव साथीला राहील, याची मी ग्वाही देतो.

(**जी. श्रीकांत, भाप्रसे** )

जिल्हाधिकारी, अकोला

## गांवक-यांचा संकल्प

आम्ही ........................................ या गावातील गावकरी ग्रामदेवतेला व कुटूंबाला स्मरुन संकल्प करतो की, दुष्काळ, नापिकी किंवा आर्थिक संकटामुळे आम्ही कधीच खचून जाणार नाही. आत्महत्या करणे हा कुटूंबाला व गावाला कलंक असून तो आम्ही कधीही लागू देणार नाही, याची आम्ही ग्वाही देतो. आमच्या गावातील शेतकरी, शेतमजूर व इतर कोणीही आर्थिक संकटात सापडल्यास आम्ही सर्व मिळून त्यास मदतीचा हात देऊ आणि स्वाभिमानाने जीवन जगण्याचा प्रयत्न करु.

आत्महत्या करणे हे समस्येचे उत्तर नसून ती अनेक समस्याची सुरुवात आहे. त्यामुळे आम्ही अशी शपथ घेतो की, आम्ही कधीच आत्महत्या करणार नाही अथवा आमच्या गावातील कुणास आत्महत्या करुही देणार नाही. आम्ही सारे मिळून आमचे गाव 'आत्महत्या मुक्त' गाव करण्याचा संकल्प करीत आहोत.

# <u>प्राथमिक उपाय योजना</u>

१. सदर समितीने पंधरा दिवसातुन एकादा समुपदेशन करण्यासाठी सभा घ्यावी.

२. गावपातळीवरुन आलेलया यादीनुसार तालुकास्तरीय अधिकारी या संदर्भात विभाग निहाय प्रकरणे करून त्यानुसार योग्य पध्दतीने मार्गदर्शन करतील व त्याप्रमाणे लेखी स्वरुपात कळवतील. त्यांचे कार्यालयातील तयार करून जिल्हाधिकारी यांना अहवाल सादर करतील.

३. प्रत्येक ग्रामसभेमध्ये चर्चा करून तशा प्रकारचे कार्यवृत्तांत घेणे.

४. शासनाच्या विविध योजनांची माहिती गावांमध्ये समुदेशन करण्यासाठी विविध योजनांची माहिती मिळण्यासाठी प्रत्येक होणा-या ग्रामसभेध्मये शासनाच्या विविध योजनांची माहिती द्यावी.

५. शेतक-यांचे समुपदेशन करण्याच्या संदर्भातील माहिती सर्वसामान्य लोकांपर्यंत जाण्याकरीता २ ऑक्टोंबर ग्रामसभेमध्ये माहिती घ्यावी.

६. त्यानंतर दरमहिन्याला गावातील गुरूदेव सेवा मंडळ भजनी मंडळी, वारकरी संप्रदाय व सेवाभावी संस्थांच्या मदतीने गावांमध्ये शेतक-यांचा प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजीत करावा.

७. दरमहिन्याला गावातील विद्यार्थी, सेवानिवृत्त शिक्षक,व इतर सेवानिवृत्त कर्मचारी यांचे मार्फत ग्रामपंचायत सदस्य व इतर गावक-यांमार्फत माहिती गोळा करून संबंधीत शेतक-यांशी संपर्क साधुन त्यांच्या अडचणी दुर करण्याचा प्रयत्न करावा व त्यांच्या नोंदी घेण्याची कार्यवाही करावी.

८. गावातील महिला मंडळाच्या माध्यमातुन गावांमध्ये शेतकरी यांनी आत्महत्या करून नये याबाबत जनजागृतीचे कार्यक्रम आयोजीत करावेत.

९. या दरम्यान घरामध्ये आवश्यकता नसतांना किटक नाशक राहणार नाही याची दक्षता घ्यावी. या संदर्भात “दर महिन्याला कोरडा दिवस पाळावा”. या दिवशी घरातील महिलांनी घरामध्ये आवश्यक असणारे किटकनाशाक ग्रामपंचायतीमध्ये जमा करून द्यावे. व त्याच्या नोंदी ठेवाव्यात. व किटकनाशकाची सर्व गावातील <u>*प्रतिनिधी समक्ष*</u> विल्हेवाट लावावी.

१०. दैनंदिन जीवन जगत असतांना शिवारामध्ये संदिग्ध रित्या किंवा विवंचनेत अवेळी फिरत असल्यास व ते गावक-यांच्या दृष्टीपथास असल्यास त्याची विचारपुस करणे.

११. गावांमध्ये मी आत्महत्या करणार नाही या दृष्टीने प्रबोधनात्मक म्हणी दर्शनी भागात भिंतीवर रंगविण्यात यावे.

# समुपदेशन केंद्राने करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाय योजना

१. सर्व शेतक-यांना कर्ज मिळते किंवा नाही याची दक्षता घेणे.

२. सर्व पात्र कुटूंबांना शासकीय योजनेचे धान्य मिळते किंवा नाही.

३. दुर्धर आजारग्रस्ताची यादी तयार करुन त्यांना योग्य शासकीय दवाखान्यामध्ये पाठविण्याबाबत सल्ला देणे व ग्रामपातळीवरुन याबाबत आलेल्या यादीची दखल जिल्हा रुग्णलयांनी घ्यावी.

४. गावातील व्यसनमुक्ती साठी उपक्रम राबविणे.

५. आत्महत्या झाल्यानंतर कुटूंबाची दैनिक अवस्था कशी होते यांची माहिती शेतक-या पर्यंत देणे.

६. सर्व शेतक-यांना मा.जिल्हाधिकारी व पालकमंत्रीयांचे दिलासा प्रमाणपत्र देण्यात यावे.

७. मानसीक दृष्टया खचलेल्या व्यक्तींना वैद्यकीय मदत मिळाली पाहीजे त्यासाठी तालुका स्तरावर वैद्यकीय कँप तयार करणे.

८. समाज प्रबोधनकार, किर्तनकार व शेतीतज्ञ, मानसशास्त्रज्ञ यांचे गावोगावी कार्यक्रम आयोजीत करणे.

९. ग्रामपातळीवरील कर्मचारीयांनी संदीग्ध/मानसीक खचलेल्या शेतक-यांच्या कुटूंबाना भेटी देणे.

१०. शेतक-यांना सिंचनाच्या सोई निर्माण करणे.

****************

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाच्या मदती बाबतच्या "मिशन-ए-दिलासा" संगीत रजनी कार्यक्रमा मधुन प्राप्त मदत निधी व कार्यक्रमाचे खर्च विवरण

| कार्यक्रम विवरण | जमा- खर्चाचे विवरण |
|---|---|
| संगीत रजनी कार्यक्रमाच्या पावती वाटपातुन एकुण प्राप्त निधी रक्कम | **8,58000/-** |
| स्वछंद ग्रुप पुणे च्या कलावंताचे प्रवास,भोजन, निवास खर्च व मानधन रक्कम | **1,00000/-** |
| कार्यक्रमाच्या जाहीरात,छपाई,डेकोरेशन व बैठक व्यवस्था खर्च | **80,000/-** |
| कार्यक्रमाला साऊंड सिस्टीम खर्च | **40,000/-** |
| आत्महत्याग्रस्त कुटूंबाच्या मदतीकरीता शिल्लक रक्कम | **6,38000/-** |

जिल्हयातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी व शेतकरी आत्महत्याग्रस्त निराधार कुटूंबाला रोजगार उपलब्धतेकरीता निधी उभारण्यासाठी दिनांक.०९/०१/२०१६ शनिवार सायंकाळी ६.०० वाजता खुले नाटयगृह अकोला येथे मिशन-ए-दिलासा अंतर्गत अकोला जिल्हा प्रशासन व जिजाऊ महिला विकास व बालकल्याण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत केलेल्या "संगीत रजनी" कार्यक्रमामधुन प्राप्त निधी व सदर कार्यक्रमास आलेला खर्च वरील प्रमाणे असुन कार्यक्रमातील शिल्लक रक्कम ही मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष अकोला जिल्हा नॅचरल क्लॅमिटी रिलीफ फंड अकोला, या खात्यामध्ये वर्ग करण्यात येत असुन सदर माहीती ऑनलाईन करण्यात येत आहे.